# हमीभाव मिळाला तर आत्महत्या थांबतील!

## प्रसिद्ध अभिनेते नाना पाटेकर यांचे मत; नव्या तंत्रज्ञानामुळे शेतकऱ्यांना फायदा

**प्रतिनिधी, पुणे**

**शेतामध्ये पिकविलेला** माल घेऊन शेतकरी विकायला येतो. पण, त्यांच्या मालाची किंमत दुसराच कोणीतरी ठरवतो. तेव्हा त्याला केविलवाण्या नजरेने बघावे लागते. त्याला दराबाबत तडजोड करावी लागते. त्यामुळे शेतमालाला हमीभाव मिळाला तरच शेतकऱ्यांच्या आत्महत्या थांबतील, असे मत अभिनेते नाना पाटेकर यांनी सोमवारी व्यक्त केले. नव्या तंत्रज्ञानाचा वापर करून शेतकरी ऑनलाइन विक्री करू शकणार असल्याने हे त्याला फायदेशीर ठरेल, असा आशावादही त्यांनी व्यक्त केला.

मायविश्व टेक्नॉलॉजीतर्फे निर्मिलेल्या मोबाइल ॲपला नाना पाटेकर यांच्या नाम स्वयंसेवी संस्थेने पाठबळ दिले आहे. त्या निमित्ताने पाटेकर यांनी संवाद साधला. 'माय विश्व'चे संस्थापक व मुख्य कार्यकारी अधिकारी मंदार जोगळेकर उपस्थित होते.

पाटेकर म्हणाले, शेतमालाशिवाय इतर गोष्टींना हमीभाव असतो. मग शेतमालालाच का मिळत नाही. शेतीतही अवजारे, खते, बी-बियाणे यांच्या किमती सतत वाढत असतात. त्यामुळे शेतकऱ्यांना हमीभाव मिळाल्याशिवाय शेतकऱ्यांच्या आत्महत्या थांबणार नाहीत. नव्या तंत्रज्ञानामुळे शेतकरी व्यापाऱ्यांपर्यंत आणि व्यापारी शेतकऱ्यांपर्यंत पोहोचतील. शेतकऱ्यांना बाजारात येण्याची गरज पडणार नाही. शेतकऱ्यांचा वाहतुकीचा खर्चही कमी होईल. मी आणि मकरंद अनासपुरे हे नट म्हणून नाम संस्थेचे चेहरे आहोत. पण, संस्थेची कामे ही लोकसहभागातून केली जातात, असेही त्यांनी सांगितले.

### अन्यायाचा प्रतिकार आवश्यक...

समाजातील कुणाचीही मुलगी ही आपलीच माता, भगिनी आहे, या भावनेतूनच त्यांच्याकडे पाहिले पाहिजे. महिला आणि युवतींनीही गप्प न बसता अन्याय-अत्याचार करणाऱ्यांचा जोरदार प्रतिकार करणे आवश्यक आहे. अशा घटनांना प्रतिकार करण्याची वृत्ती तरुणांमध्येही वाढली पाहिजे, अशा शब्दात अभिनेते नाना पाटेकर यांनी महिलांवरील अन्यायाविरुद्ध प्रतिक्रिया व्यक्त केली. नगर जिल्ह्याच्या कर्जत तालुक्यातील कोपर्डी येथे अल्पवयीन मुलीवर अन्याय-अत्याचार करून तिचा निर्घृण खून केल्याची घटना नुकतीच घडली. या घटनेला जातीय आणि राजकीय रंग दिला जात असल्याच्या प्रश्नावर पाटेकर म्हणाले, माझ्यासोबत जर असं कोणी वागले असतं, तर मी त्याला स्वसंरक्षणासाठी मारलं असतं. मी जातीयवादाच्या कायम विरोधी आहे. आपल्याकडे जात हा 'कॉलम'च काढून टाकायला पाहिजे. आपली जात घरातच ठेवा, आपण रस्त्यावर उतरतो, तेव्हा भारतीय म्हणूनच वावरायला पाहिजे. तरच देशाची प्रगती होऊ शकेल.